# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

म्हाडा
MHADA

## नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वास्तुशास्त्रज्ञ /नियोजन सल्लागाराच्या पॅनलवर वास्तुशास्त्रज्ञ / सल्लागारांची नेमणूक करण्याबाबत.(सन २०२३ -२०२७ करिता)

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक असलेल्या नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विविध गृहनिर्माण व इतर योजनांचे आराखडे/नकाशे तयार करण्याचे काम अनेकदा व्यावसायिक वास्तुशास्त्रज्ञ/ समंत्रकामार्फत करुन घेण्यांत येते. खालील बाबींमध्ये स्वारस्य असणाऱ्यांनी विहित नमून्यात सविस्तर माहिती पाठवावी.

**१) गृहनिर्माण योजना** **२) लँडस्केपींग कामे .**

नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कार्यकक्षेत **नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगांव** व **अहमदनगर** या महाराष्ट्र राज्यामधील ५ जिल्हयांचा समावेश आहे. वास्तुशास्त्रांकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

अ) वास्तुशास्त्रज्ञ परिषदेमध्ये नोंदणी (Council Of Architecture)

ब) गृहनिर्माण पॅनलसाठी कमीत कमी ५ वर्षाचा व्यावसायिक अनुभव व लॅन्डस्केप पॅनेलसाठी कमीत कमी ३ वर्षाचा सर्व कामासाठी अनुभव

क) समंत्रक वास्तुशात्रज्ञांनी कमीत कमी ३ गृहनिर्माण योजनांचे काम प्रत्येकी किमान रु. ४.५ कोटीचे किंवा ३००० चौ.मी बांधकाम क्षेत्रफ़ळाचे गृहनिर्माण प्रकल्प व १०० चौ.मी.पेक्षा कमी नसलेले किंवा इतर प्रकल्पाचे काम पुर्ण केलेल असणे आवश्यक आहे.

ड) गृहनिर्माण पॅनेलकरिता फ़र्म च्या सेवेत कमीत कमी एक वास्तुशास्त्र व लॅन्डस्केप पॅनलसाठी एक शैक्षणिक पात्रताधारक सहाय्यक असणे आवश्यक आहे.

इ ) वास्तुशात्रज्ञांच्या फ़र्म मध्ये सर्व पार्टनर COA नोंदणीकृत असणे बंधकारक आहे.

सदर माहिती विहीत नमुन्यात देणे आवश्यक आहे. सदरचा विहित नमुना लेटरहेडवर खालिल पत्यावर अर्ज केल्यानंतर व्यक्तीशः अथवा २३ से.मी. X १० से.मी. आकाराच्या स्वतःचा पत्ता लिहिलेला व आवश्यक पोस्ट स्टॅप लावलेला लिफाफा दिनांक ५/०९/२०२२ ते २३/०९/२०२२ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत पाठविल्यास पुरविण्यात येईल. विहीत नमुन्यातील अर्जाची किंमत रुपये ५९०/- (Including GST) असून ती रोखीने किंवा मुख्य लेखाधिकारी ,नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नाशिक या नावाने नाशिक शाखेवर देय असलेल्या डिमांड ड्राफ्टने भरता येईल.

विहीत नमुन्यातील अर्जाची विक्री व स्विकृती वास्तुशास्त्रज्ञ नियोजन विभाग /नाशिक मंडळ या विभागात केली जाईल. सध्या पॅनेलवर असलेल्या समंत्रक वास्तुशास्त्रज्ञ यांनीही पुन्हा विहीत नमुन्यातील अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जातील कोणतीही माहिती चूकीची आढळल्यास नोंदणी रद्द करण्यांत येईल. सदर पॅनलची मुदत ५ वर्षे असेल. विहित नमुन्यातील पूर्ण भरलेले अर्ज दिनांक ३/१०/२०२२ ते १४/१०/२०२२ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत या कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे. तदनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

Sd/-

(शिवाजीराव ढवळे)
सभापती
नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास
मंडळ,नाशिक

(टी.डी.कासार)
मुख्य अधिकारी
नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास
मंडळ,नाशिक

पत्ता-
नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन (२ रा मजला),रामगणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड,नाशिक ४२२००२.